**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि मिनी अंगणवाडी सेविका यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्तींमध्ये सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६**
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ११ ऑगस्ट,२०२३

**संदर्भ :-** १) महिला व बाल विकास विभाग, शा.नि. क्र.एबावि-२०१२/प्र.क्र.४२९/का.६, दि.१३.०८.२०१४.
२) महिला व बाल विकास विभाग, शा. नि. क्र.एबावि-२०१६/प्र.क्र.२३०/का.६, दि. २२.०९.२०१६
३) महिला व बाल विकास विभाग, शा. नि. क्र.एबावि-२०२०/प्र.क्र.३०/का.६, दि.०१.०७.२०२१.
४) महिला व बाल विकास विभाग, शा. नि. क्र.एबावि-२०१७/प्र.क्र.२७९/का.६, दि. ३०.११.२०१८.
५) केंद्र शासनाचे आदेश क्रमांक-११/४/२०२१-CD-I (e-९५७०६), दिनांक ०१.०८.२०२२
६) महिला व बाल विकास विभाग शा. नि. क्र. एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६, दि. ०२.०२.२०२३

**शासन निर्णय:-**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेमधील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती संदर्भाधीन क्रमांक ६ येथील दिनांक ०२.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने नियुक्तीच्या अटी व शर्ती संदर्भात खालीलप्रमाणे तरतूद समाविष्ट / सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| शासन निर्णय दिनांक ०२.०२.२०२३ मधील तरतूद | सुधारित तरतूद |
|---|---|
| अंगणवाडी सेविका आणि मिनी अंगणवाडी सेविका तसेच मदतनीस पदासाठी इयत्ता १२ वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) अशी किमान शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील. | अंगणवाडी सेविका आणि मिनी अंगणवाडी सेविका तसेच मदतनीस पदासाठी इयत्ता १२ वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) अशी किमान शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील. तथापि, उमेदवार उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (इयत्ता १२ वी) उत्तीर्ण नाही. परंतु, **यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण असल्यास त्या उमेदवारास पदवी परीक्षेचे गुणदानानुसार गुणदान (परिशिष्ट "अ" मधील गुणदान तक्त्यातील गुणदानानुसार) करावे व तो पदवीधर उमेदवार इयत्ता १२ वी उत्तीर्ण आहे असे समजून त्यास शैक्षणिक पात्रतेच्या अनुषंगाने इयत्ता १२ वी करिता गुणदान करताना (परिशिष्ट "अ" मधील गुणदान तक्त्यातील गुणदानानुसार) ३५ गुण देण्यात यावेत.** |
| "शासकीय मान्यता संस्थेचे संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MS-CIT)" :- द्यावयाचे गुण-२ | **"शासन मान्य संस्थेचे संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MS-CIT) अथवा शासनाने वेळोवेळी समकक्ष ठरविलेला संगणक अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र असल्यास" :- द्यावयाचे गुण-२** |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०८१११७१०५९२६३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS RAMDAS THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b308614534, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C8B1E52C5C4F922AB6EB7A0B44101C838AEA34F29FBFF0AEBE9D85C3DE3468C2, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2023.08.21 17:11:16 +05'30'

**( वि. रा. ठाकूर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा. सभापती / मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३) मा. अध्यक्ष / मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४) सर्व सन्माननीय विधानसभा,विधानपरिषद व संसद सदस्य,
५) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई,
८) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई,
१०) आयुक्त, महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य, पुणे,
११) सर्व जिल्हाधिकारी,
१२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१३) सर्व विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास),
१४) सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास),जिल्हा परिषद,
१५) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी ( ग्रामीण/नागरी/आदिवासी) प्रकल्प,
१६) निवड नस्ती -का-६.